प्रादेशिक अधिकारी, मऔविम, बारामती कार्यालय कार्यान्वित करणेसाठी आवश्यकती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबत.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र,
अंधेरी (पूर्व), मुंबई- ९३
दुरध्वनी क्रमांक -०२२-४७४८८३१२ / ४७४८४६९९ / ४७४८४६७९
email-adminofficer@midcindia.org

// उद्यमात् सकल समृद्धिः //
MIDC
MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION
स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ३५०

क्र.मऔविम/ साप्रवि/प्रा.अ. बारामती / P310408 /२०२४, दिनांक:- 06 SEP 2024

**कार्यालयीन आदेश :-**

महामंडळाचा कार्यालयीन आदेश क्र. पी-२९४८९३, दिनांक १३/०८/२०२४ अन्वये नव्याने मान्यता देण्यात आलेली ७ प्रादेशिक कार्यालये कार्यान्वित करणेसाठी आवश्यकती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबतचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने प्रादेशिक कार्यालय, मऔविम, बारामती हे कार्यालय कार्यान्वित करणेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) प्रादेशिक कार्यालय, मऔविम, पुणे-१, प्रादेशिक कार्यालय, पुणे-२ तसेच प्रादेशिक कार्यालय, मऔविम बारामती या कार्यालयाचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | कार्यालयाची कार्यकक्षा |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक कार्यालय, पुणे-१ | पुणे जिल्ह्यातील पुणे शहर, खेड, मावळ, जुन्नर, आंबेगाव या तालुक्यातील कार्यरत औद्योगिक क्षेत्रे व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे तसेच सदर तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रांशी निगडीत भूसंपादनाची कामे. |
| २ | प्रादेशिक कार्यालय, पुणे-२ | पुणे जिल्ह्यातील हवेली, वेल्हे, भोर, मुळशी, शिरुर या तालुक्यातील कार्यरत औद्योगिक क्षेत्रे व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे तसेच सदर तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रांशी निगडीत भूसंपादनाची कामे . |
| २ | प्रादेशिक कार्यालय, बारामती | पुणे जिल्ह्यातील बारामती, दौंड, पुरंदर, इंदापूर या तालुक्यातील कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे व सदर तालुक्यांमधील औद्योगिक क्षेत्रांशी निगडीत भूसंपादनाची कामे. |

तसेच महामंडळाचे दिनांक १३/०८/२०२४ रोजीचे कार्यालयीन आदेशाचे अनुषंगाने या आदेशाचे दिनांकापासून प्रादेशिक अधिकारी, **प्रादेशिक कार्यालय, मऔविम, पुणे-१** यांनी पुणे जिल्ह्यातील पुणे शहर, खेड, मावळ, जुन्नर, आंबेगाव या तालुक्यातील कार्यरत औद्योगिक क्षेत्रे व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे तसेच सदर तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रांशी निगडीत भूसंपादनाची कामे, **प्रादेशिक कार्यालय, पुणे-२** यांनी पुणे जिल्ह्यातील हवेली, वेल्हे, भोर, मुळशी, शिरुर या तालुक्यातील कार्यरत औद्योगिक क्षेत्रे व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे तसेच सदर तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रांशी निगडीत भूसंपादनाची कामे तसेच **प्रादेशिक कार्यालय, बारामती** यांनी पुणे जिल्ह्यातील बारामती, दौंड, पुरंदर, इंदापूर या तालुक्यातील कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे व सदर तालुक्यांमधील औद्योगिक क्षेत्रांशी निगडीत भूसंपादनाची कामकाज पहावे.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

२) प्रादेशिक कार्यालय, पुणे-१ आणि प्रादेशिक कार्यालय, पुणे-२ यांनी पुणे जिल्ह्यातील बारामती, दौंड, पुरंदर, इंदापूर या तालुक्यातील सर्व कार्यरत व प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांशी सबंधीत सर्व नस्ती व इतर सर्व प्रकारची कागदपत्रे प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, बारामती यांचेकडे हस्तांतर करावेत.

३) प्रादेशिक कार्यालय, मऔविम, बारामती या नव्याने स्थापन करण्यात आलेल्या कार्यालयातील प्रादेशिक अधिकारी, मऔविम, बारामती या पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रादेशिक अधिकारी, मऔविम, पुणे-१ यांचेकडे या आदेशाद्वारे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात येत आहे. तसेच अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेल्या प्रादेशिक अधिकारी यांनी त्यांना सोपविण्यात आलेल्या प्रादेशिक कार्यालयामध्ये आठवडयातून दोन वेळा उपस्थित राहून कार्यालयीन कामकाज पहावे. तसेच प्रादेशिक कार्यालय, बारामती येथे नियुक्त अधिकारी /कर्मचारी यांनी प्रादेशिक कार्यालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी ( बारामती) उपस्थित राहून कार्यालयीन कामकाज सुरु करणेबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

४) प्रादेशिक कार्यालय, बारामती हे कार्यालय या आदेशाच्या दिनांकापासून प्रादेशिक कार्यालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत होईल याबाबतची सर्व जबाबदारी संबधित अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेले प्रादेशिक अधिकारी तसेच मुख्य अभियंता, पुणे यांची राहील

५) महामंडळाच्या दिनांक १३/०८/२०२४ चे कार्यालयीन आदेशान्वये आवश्यक ती अनुषंगीक कार्यवाही करणेबाबत देण्यात आलेल्या सूचना कायम राहतील.

सदर आदेश मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(तुषार मठकर)
**महाव्यवस्थापक (मबवि)**
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई.
- मा. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन/विदर्भ), मऔविम, मुंबई.

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता :-**

- सर्व विभाग प्रमुख / कार्यालयीन प्रमुख, मऔविम.
- मुख्य अभियंता, मऔविम,पुणे.
- प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, कोल्हापूर.
- प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सातारा.
- सुरक्षित नस्ती/कार्यालयीन आदेश नस्ती/वैयक्तीक नस्ती.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in